# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक १२/२०२१** **दिनांक ०९/०२/२०२१** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०२/२०२१ ते ०९/०२/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०२/२०२१ सकाळी ८:३० पासून १४/०२/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **०३/०२** | **०४/०२** | **०५/०२** | **०६/०२** | **०७/०२** | **०८/०२** | **०९/०२** | | **१०/०२** | **११/०२** | **१२/०२** | **१३/०२** | **१४/०२** |
| ०.० | ०.० | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३४.८ | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३६ | ३६ | ३७ | ३७ | ३६ |
| १४.० | १४.० | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | १७ | १८ | १८ | १९ | १९ |
| ० | ० | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | निरभ्र |
| ८१ | ७१ | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६७ | ६७ | ७० | ७२ | ७२ |
| १९ | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३७ | ३९ | ४१ | ४४ | ५७ |
| ३.३ | २.५ | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ६ | ५ | ४४ | ३ | ४ |
| आ. | नै.प. | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | पू. | ई. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **०.०** | **३०९०.६** |

## हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहून दिनांक १० ते १४ फेब्रुवारी २०२१ दरम्यान कमाल आणि किमान तापमानात वाढ संभवते.** |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **आंबा** | मोहोर ते फळधारणा अवस्था | • **हवामान पुर्वानुमानानुसार तापमानात वाढ होवून आर्द्रतेत घट होण्याची शक्यता वर्तविली असल्याने फळधारणा** झालेल्या आंबा बागेमधील वाटाणा ते सुपारी आकारांच्या फळांची गळ होण्याची शक्यता असल्याने फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात आठवड्याच्या अंतराने फळे सुपारीच्या आकाराच्या अवस्थेपर्यंत द्यावे.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी. पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• **मोहोर फुटलेल्या** आंबा बागेमध्ये मोहोरावर **तुडतुडे, मिजमाशी इ.किडींचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **मोहोर फुलण्यापूर्वी** तुडतुडे आणि मिजमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • (टीप: मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी **परागीकरणाचा कालावधी वगळून** सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.)<br>• आंबा **फळधारणा** होवून वाटाणा आकाराच्या अवस्थेत असताना फळांवर तुडतुड्याचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्यामुळे मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार **चौथी फवारणी** (तिसऱ्या फवारणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने) थायमेथाक्झाम २५ टक्के डब्ल्यु. जी. १ ग्रॅम + भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.<br>• मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार चौथ्या ते सहाव्या फवारणीत **फळगळ कमी करण्यासाठी २ टक्के युरिया (२० ग्रॅम युरिया/ लिटर पाण्यातून) फवारावे**. यासाठी प्रथम युरिया पाण्यात पूर्णपणे विरघळून घ्यावा व नंतर त्यात कीटकनाशक टाकावे.<br>• या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | फळधारणा | • **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• तापमानात वाढ व आर्द्रतेत घट **फळधारणा** झालेल्या काजू झाडांना पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना ८ दिवसांच्या अंतराने १५ लिटर पाणी प्रति कलम देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• <u>**टीप:**</u> ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात. |
| **नारळ** | फळधारणा | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच माडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **सुपारी** | फळधारणा | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने सुपारी बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भात** | वाढीची अवस्था | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी. |
| **वाल, चवळी** | शेंगा अवस्था | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने तसेच वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सर्वेदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **पांढरा कांदा** | वाढीची अवस्था | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने कांदा पिकामध्ये आठवड्याच्या अंतराने नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कलिंगड** | फळधारणा | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने फळधारणा अवस्थेत असलेल्या कलिंगड |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | पिकाला ३ ते ४ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. पाण्याच्या अनियमित पाळ्या दिल्यावर फळे तडकण्याची शक्यता असते.<br>• कलिंगडाच्या फळांचे सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी फळे भाताच्या पेंढ्याने किंवा गवताने झाकून घ्यावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |
| **कुकुटपालन** | - | • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. | | |